# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./९९८/२०१९ दि.१६/०२/२०१९

## परिपत्रक

**विषय :- महाविद्यालय व विद्यापीठात मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत.**

संदर्भ :- १) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिसं/ मवि-१/मराठी साहित्य व संस्कृती संवर्धन/२०१९/२२८४, दिनांक १४/०२/२०१९
२) शासन पत्र क्र. संकीर्ण/२०१९/प्र.क्र.३७/मशि-२, दिनांक ०६/०२/२०१९

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, मा. अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०१८ यांच्या दिनांक २५/११/२०१८ च्या पत्राची प्रत संलग्नित असुन सदर पत्रान्वये महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणे व वाचन संस्कृती रूजविण्याकरीता दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भीय पत्रान्वये निर्देशीत केले असल्याने उक्तबाबीनुसार आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव

सहपत्र :- संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पी. जी. टी. डी. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

उच्च शिक्षण, कार्यालय
जावक क्र. ...... दि. ..........
आवक 1926 16/2/19

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.**

**Web :** www.dhepune.com **E-Mail :** mavi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.: उशिसं/ /मवि-१/मराठी साहित्य व संस्कृती संवर्धन/२०१९/2226 दिनांक: 14 FEB 2019

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 516 दि. 16-2-19
जावक क्र. ........ दि. ........

प्रति,
१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय: महाविद्यालय व विद्यापीठात मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत..**

संदर्भ: शासनपत्र क्र.: संकीर्ण/१०१९/प्र.क्र.३७/मशि-२ दि. ६.२.२०१९

उपरोक्त विषयाबाबत अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन २०१८ यांच्या दिनांक २५.११.२०१८ च्या पत्राची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली आहे, कृपया अवलोकन करावे.

सदर पत्रान्वये महाविद्यालय व विद्यापीठांमध्ये मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणे व वाचन संस्कृती रुजविण्याकरिता दिलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यातबाबत आपल्या अधिनस्त सर्व संलग्नित महाविद्यालयांना सूचना देण्यात याव्यात.

15/2

**(डॉ. मोहन खताळ)**
शिक्षण सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

प्रत: मा. ह.व्यं.प-हाते - कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

25/10/2018

प्रति,

मा. मंत्री,
शालेय शिक्षण, उच्च शिक्षण तथा
मराठी भाषा विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय - मराठी साहित्य व संस्कृती संवर्धनाचे उपक्रम राबविणेबाबत.

या सोबत एक टिपणी दोन प्रतीत जोडली आहे, तिचा विषय आहे -
(महाविद्यालय व विद्यापीठात मराठी संस्कृती संवर्धिनी स्थापन / स्थापन करून उपक्रम सुरु करणे)

हा विषय ......उच्च शिक्षण...... विभागाशी संबंधित आहे. दिनांक २५/१०/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे या बाबत उचित कार्यवाही करण्यासाठी ......उच्च शिक्षण...... विभागाच्या (प्रधान) सचिवांना आपण योग्य ते निर्देश द्यावेत ही विनंती.

आपला विश्वासू,

(लक्ष्मीकांत देशमुख)
अध्यक्ष, अ.भा.मराठी साहित्य संमेलन
२०१८

कक्ष/संकलन
प्रधान सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई
25/10/18

# महाविद्यालय व विश्वविद्यालयात वाचन संस्कृती रुजवण्यासाठीच्या उपाययोजनांची टीपणी / प्रारूप

## १. प्रस्तावना

सजग, चोखंदळ व विचार करणारा वाचकवर्ग ज्या समाजात विपुल असते, तो समाज निकोप व निरोगी असतो. तिथे लोकशाही जिवंत व संवादी राहते. असा वाचकवर्ग निर्माण करण्यासाठी जिवंत व चैतन्यमय वाचनसंस्कृती निर्माण करावी लागते. मराठीचा विचार केला तर, ती पुरेशा प्रमाणात रुजली नाही, हे वास्तव आहे. मराठी भाषा व साहित्याचा प्रसार व वाढीसाठी महाविद्यालयीन व विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांत वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी विशेष प्रयत्न, तेही कल्पकतेने राबवण्याची गरज आहे.

२०१८ च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष या नात्याने पुढाकार घेत साहित्य परिषद व विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने काही उपाययोजना उभयतांच्या सहमतीने करण्याचे प्रस्तावित आहे.

## २. वाचनसंस्कृतीसाठी वाङ्मय मंडळ स्थापन करणे

महाराष्ट्रात अनेक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळे आहेत, पण जिथे कला विभाग / शाखा नाही, त्या महाविद्यालयात ती नसतता. पण मराठी भाषकांच्या महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थी हा चोखंदळ वाचक व्हावा व मराठी भाषा- मराठी संस्कृतीसाठी त्याने/तिने योगदान द्यावे यासाठी विद्यापीठ परिपत्रक काढून वा अन्य पद्धतीने त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शारीरिक शिक्षण, व्यवस्थापन व अभियांत्रिकी आदी महाविद्यालयात जिथे प्रामुख्यापे मराठी भाषिक विद्यार्थी असतात, तिथे मराठी वाङ्मय मंडळ स्थापन करण्याचा आदेश द्यावेत व त्याची अंमलबजावणी २०१८-१९ च्या शैक्षणिक वर्षात सुरू करावी. त्यासाठी 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६' कायद्याचे कलम (६४) विद्यापीठाला अशा उपाययोजना करण्यासाठी बंधनकारक करते. ते कलम असे आहे;

(६४) विद्यापीठाने स्वत: किंवा इतर विद्यापीठाच्या सहकार्याने राज्य शासनाच्या धोरणाचे अनुपालन करण्यासाठी मराठीचा अभ्यासक्रम आणि शिक्षण, अभ्यास, संशोधन व परीक्षा यांचे माध्यम म्हणून मराठीचा वापर करण्यास चालना देणे.

यात शिक्षण व अभ्यासक्रमांतर्गत अवांतर वाचन येते हे उघड आहे. अभ्यासक्रमाव्यतिरिक्त ललित व ललितेतर (ज्ञान व माहिती) साहित्य विद्यार्थ्यांनी वाचणे हे व्यापक अर्थाने राष्ट्र उभारणीसाठी चालना देणारे शिक्षण होय. त्यामुळे प्रत्येक महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळ स्थापन होणे, मराठीच्या राज्यशासनाच्या धोरणाला पूरक ठरते. म्हणून त्यांची स्थापना करण्यात यावी. त्याचा केंद्रबिंदू कॉलेजचे ग्रंथालय व भाषाप्रेमी प्राध्यापक करतील.

## ३. मराठी वाङ्मय मंडळाच्या कामकाजाची रूपरेषा व कृती कार्यक्रम

प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी परिषदेची ज्या पद्धतीने निवडणूक होते, त्याप्रमाणे किंवा अन्य पद्धतीने मराठी वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष व दहा सदस्य (पाच मुले व पाच मुली) निवडावेत. हे मंडळ जुलै–ऑगस्टमध्ये कार्यान्वित व्हावे व पूर्ण शैक्षणिक वर्षात मंडळाने किमान सहा कार्यक्रम घ्यावेत, असे परिपत्रकाद्वारे आदेशीत करून त्यात दरवर्षी एका साहित्यिकाला बोलावून उद्घाटन करणे व त्यांच्या समावेश साहित्यिक संध्याकाळ संपन्न करणे, कथाकथन, कविता वाचन/ गायन कार्यक्रम, साहित्यिक वार्षिकांक, साहित्यिकांची व्याख्याने / मुलाखती, कॉलेजस्तरावर लेखनस्पर्धा आणि दोन दिवसांचे महाविद्यालयीन स्तरावरचे विद्यार्थ्यांचे साहित्य संमेलन घेणे, तसेच विकली बुकक्लब असे उपक्रम घेता येतील. त्यासाठी विद्यापीठातील मराठी विभागाने काम करावे व वाङ्मय मंडळासाठी दरवर्षी किमान १५-२० नवे कार्यक्रम सुचवावेत, ते किंवा अन्य उपक्रम कॉलेजच्या वाङ्मय मंडळाने राबवावेत. त्यासाठी साहित्य परिषद संसाधन संस्था (रिसोर्स इन्स्टिट्यूट) म्हणून काम करेल. त्यासाठी विद्यापीठाशी सामंजस्य करार करून प्रत्येक महाविद्यालयातील वाङ्मय मंडळाने चैतन्यमय रीतीने चालून विद्यार्थ्यातून चांगले वाचक व लेखक-कवी निर्माण होतील. याच्या जोडीने हे वाङ्मय मंडळा एकांकि‌ा- नाटके दरवर्षी बसवेल, तसेच चित्रपट रसस्वाद कार्यशाळा, सर्जनशील लेखन कार्यशाला आदी उपक्रम राबवू शकेल.

४. अंमलबजावणीसाठी देखरेख यंत्रणा

विद्यापीठाचा मराठी विभाग मार्गदर्शन, देखरेख व पर्यवेक्षण करेल. त्याला तसे प्राधिकृत करावे व एका प्राध्यापकाकडे ही जबाबदारी द्यावी. तसेच वर्षभरात दोनदा महाविद्यालयाकडून झालेल्या कामाचा लेखी अहवाल मागवावा. तसेच दरवर्षी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी प्रत्येक कॉलेजच्या वाङ्मय मंडळाचा अध्यक्ष व दोन प्रतिनिधी (एक महिला आवश्यक) आणि कॉलेजच्या मराठी विभाग प्रमुख किंवा जिथे मराठी विभाग नाही तिथे प्राचार्य प्राधिकृत प्राध्यापकांची मराठी विभागाने साहित्य परिषदेच्या मदतीने मार्गदर्शनासाठी व उपक्रमासाठी त्याची उत्तम आखणी व अंमलबजावणीसाठी एक दिवसीय कार्यशाळा घ्याव व वर्षभर देखरेख करावी.

५. अपेक्षित फलश्रुती

- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६च्या कलम (६४)चे यथोचित पालन.
- कॉलेज विद्यार्थी बहुश्रुत वाचक होतील.
- कॉलेजची ग्रंथालये वाङ्मय मंडळाचा केंद्रबिंदू असल्यामुळे ती सुसज्ज व चैतन्यमय ज्ञानकेंद्रे होतील.
- तरुणाईची अभिव्यक्ती मराठीत अधिक जोमाने होईल.
- विद्यार्थी बहुश्रुत व ज्ञानसंपन्न अवांतर वाचनाने होतील.

सादर कर्ता

**लक्ष्मीकांत देशमुख, आय. ए. एस. (नि)**

अध्यक्ष,

**अ.म. साहित्य संमेलन २०१८**